# जाहिर आवाहन

शहरातील सर्व नागरीकांच्या निदर्शनास आणण्यात येते की, उल्हासगनर शहरामध्ये मोठया प्रमाणावर झालेली अनधिकृत बांधकामे, करण्यात आलेल्या बांधकामांमध्ये भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त न करुन घेणे, बांधकाम पुर्ण झाल्यानंतर कोणत्याही परवानगीशिवाय संबधित रहिवाश्यांनी इमारतींमध्ये व त्यांचे घरामध्ये केलेली अंतर्गत सजावट, बाल्कनी व टेरेस मध्ये केलेली अनधिकृत बांधकामे, इमारतीच्या बिम व कॉलम यांना हानी होईल अशाप्रकारे केलेल्या हानीकारक दुरुस्त्या, घरामध्ये पाण्याचा अतिरिक्त साठयासाठी मोठया क्षमतेच्या टाक्या बसवून इमारतीवरील भार वाढविणे, इमारतीच्या झालेल्या लिकेजस तसेच अन्य नादुरुस्तीची वेळीच दखल न घेणे, यासारख्या मानवी हस्तक्षेपांच्या कारणामुळे इमारत धोकादायक होवून त्या पडण्याची शक्यता निर्माण झाल्या आहेत.

तरी यासर्व बाबी विचारात घेवून भविष्यात शहरातील नागरिकांच्या जिवित व अन्य प्रकारची हानी होऊ नये याकरिता खालीलप्रमाणे सर्व शहरातील नागरिकांना खालीलप्रमाणे सूचना व आवाहन करण्यात येत आहे.

१. शहरातील सन २००८ पूर्वीच्या असलेल्या किंवा यानंतरच्या कालावधीच्या तथापि तेथील रहिवाश्यांना इमारतीच्या सुस्थितीबाबत शंक असल्यास अशा इमारतीतील रहिवाश्यांनी तात्काळ मान्यताप्राप्त व योग्य अर्हताधारक अशा Structural Engineer कडून Structural Audit करुन घेवून त्याची प्रत महानगरपालिकेच्या प्रभाग समिती कार्यालय, उल्हासनगर महानगरपालिका, यांचेकडे सादर करावी. संरचनात्मक दृष्ट्या कमकुवत असलेल्या इमारतीमध्ये रहिवास अथवा वाणिज्य वापर करु नये.

२. शहरातील कोणत्याही नागरिकांनी आपल्या इमारती Structural Column व बिमच्या मुळ बांधकामास हानी होईल) अशा प्रकारे कोणत्याही दुरुस्ती अगर अंतर्गत सजावट करु नये.

३. शक्यतो पाण्याचा अतिरिक्त मोठा साठा घरात करु नये, आवश्यकता असल्यास पाणी साठविण्याकरिता कमीत कमी क्षमतेच्या टाकीचा वापर सर्व ठिकाणच्या Load Bearing ची क्षमता विचारात घेवून व त्यावर तज्ञांचा सल्ला घेवून करण्यात यावी.

४. इमारतींची किरकोळ व देखभाल दुरुस्ती, लिकेजेस यांची दुरुस्ती वेळच्या वेळी संबंधित रहिवाश्यांनी करुन घ्यावी.

५. धोकादायक इमारतीच्या सुरक्षितेबाबत काही शंका असल्यास शहरातील नागरिकांनी त्वरित महानगरपालिकेच्या सार्वजनिक बांधकाम विभाग, उल्हासनगर महानगरपालिका, यांचेशी संपर्क साधून योग्य ती कार्यवाही करावी.

**तरी सर्व नागरिकांनी वरीलप्रमाणे योग्य ती कार्यवाही वेळोवेळी करुन सहकार्य करावे, ही विनंती.**

**(डॉ. राजा दयानिधी) भा.प्र.से.**
**आयुक्त**
**उल्हासनगर महानगरपालिका**